# समर्थ वाङ्मयाचे चिरंतन जतन





सांस्कृतिकी

॥संजय देवघर

**समर्थ** रामदास स्वामींनी नाशिकच्या आगरटाकळी येथील मठात वाल्मिकी रामायणाची पाच कांडे १६२० ते १६२४ या ५ वर्षात स्वहस्ताक्षरात लिहिली. १४ वर्षाचे वय असलेल्या रामदासांनी प्रथम बालकांड लिहिले. त्यानंतर अयोध्या, अरण्य, किष्किंधा आणि सुंदरकांड लिहिली. या अमूल्य दस्ताऐवजांचे चिरंतन जतन व्हावे यासाठी धुळ्याच्या श्री समर्थ वाग्देवता मंदिराने पुढाकार घेतला आहे. आतापर्यंत २ लाख इमेजेसचे डिजिटलायझेशन पूर्ण झाले आहे. नाशिकमधील हा अध्यात्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक ठेवा धुळेकरांनी जतन केला. टाकळी मठाशी संबंधित असणाऱ्या दस्ताऐवजांचे १७ सीडीत रुपांतर करण्यात आले. अलिकडेच ते सीडी स्वरुपात टाकळी देवस्थानकडे सुपूर्द करण्यात आले. समर्थांच्या साहित्यावर संशोधन होण्यासाठी अभ्यासकेंद्राची उभारणी व्हावी अशी अपेक्षा धुळ्याच्या श्री समर्थ वाग्देवता मंदिराचे अध्यक्ष शरद कुबेर यांनी व्यक्त केली आहे. मागील वर्षी मे महिन्यात पहिले 'बालकांड' ग्रंथस्वरुपातही प्रकाशित करण्यात आले. आता संस्थेने अयोध्या, अरण्य आणि सुंदरकांड यांचे काम सुरू केले आहे. येत्या काही महिन्यातच ही तीन कांडे ग्रंथरुपात वाचकांना उपलब्ध होतील असे कार्याध्यक्ष प्रा. दे. दि. डोंगरे यांनी सांगितले.

नाशिकमधील समर्थ रामदास स्वामींचा मठ हे ऐतिहासिक स्थान आहे. समर्थांनी स्थापन केलेला हा पहिला मठ आहे. ४३ वर्षांच्या प्रदीर्घ न्यायालयीन लढ्यानंतर २०१२ साली (पान सातवर)